# पुणे विद्यापीठ

पुणे विद्यापीठ कार्यालयातील विविध शैक्षणिक विभागांतील खालील पदे **हंगामी स्वरुपात ठराविक कालावधीसाठी करार पद्धतीने भरण्याकरिता**, पात्र उमेंदवारांकडून **दि. १५/१२/२००८ पर्यंत** विहीत नमून्यात अर्ज मागविण्यात येत आहेतः

| अ.क्र. | पद व वेतनश्रेणी | पदसंख्या व आरक्षण | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| **विद्यापीठ निधीतुन ०५ वर्षे कालावधीसाठी भरावयाची पदे** | | | |
| १. | विशेष कार्य अधिकारी (रु.१२०००-४२०-१८३००) | १- अनु.जाती | Good academic record with a doctoral degree or equivalent published work. In addition to these, candidates who join from outside the University system shall also posses at least 55% of marks or an equivalent grade of B in the 7 point scale with letter grades O, A, B, C, D, E, & F at the Master's degree level.<br>**Experience:** Five years experience of teaching/research/extension education. Research contributions as evidenced by publications in reputed journals/books.<br>**OR**<br>Five years administrative experience in class I post in University/College Educational Institution/Research Centre etc. |
| २. | सहाय्यक अभियंता (स्थापत्य) (रु.६५००-२००-१०५००) | १- खुला<br>१- अनु.जमाती | स्थापत्य अभियांत्रिकी पदवी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण.<br>**अनुभवः** मोठे इमारत संकुल/व्यापारी संकुल किंवा शैक्षणिक संकुलाचा प्रत्यक्ष इमारत बांधकाम व पर्यवेक्षण याचा किमान २ वर्षांचा अनुभव. व्यवस्थापन दैनंदिन पत्रव्यवहार व करारनामे, अंदाजपत्रके तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव अत्यावश्यक आहे. |
| ३. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (रु.५५००-१७५-९०००) | १- खुला<br>१- विजा (अ)<br>१- इमाव | स्थापत्य अभियांत्रिकी पदविका द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण.<br>**अनुभवः** मोठे इमारत संकुल/व्यापारी संकुल किंवा शैक्षणिक संकुलाचा प्रत्यक्ष इमारत बांधकाम व पर्यवेक्षण याचा किमान ५ वर्षांचा अनुभव. व्यवस्थापन दैनंदिन पत्रव्यवहार व करारनामे, अंदाजपत्रके तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव अत्यावश्यक आहे. |
| **जैवमाहितीशास्त्र विभागात डी.बी.टी योजनेअंतर्गत ०५ वर्षे कालावधीसाठी भरावयाची पदे** | | | |
| ४. | तांत्रिक सहाय्यक (रु.५५००-१७५-९०००) | १- खुला | **Qualification:** BCA, BCS, B.Sc (Comp.Sci)<br>**Desirable:** BE/B.Tech/MCA/MCS/M.Sc (Comp.Sci)<br>**Experience:** Skilled in web designing and developing web based applications. Familiarity with SQL, Java, Oracle, C, C++, UNIX and Network Designing. Familiarity with maintenance of various hardware and software used in scientific and academic institutions. |
| ५. | डेटा एन्ट्री ऑपरेटर नि सहाय्यक लेखा (रु.४०००-१००-६०००) | १- इमाव | **Qualification:** B.Com with knowledge of Tally Package. English Typing with 40 wpm and Marathi Typing with 30 wpm.<br>**Desirable:** M.Com with knowledge of Tally package having completed MSCIT course.<br>**Experience:** Work experience in academic institution/ University etc. with minimum 2 years.<br>**Preference:** Preference will be given to those, who have experience of Data Entry in Tally 9 accounting package and day-to-day routine work, knowledge of on-line admission procedure. |

| अ.क्र. | पद व वेतनश्रेणी | पदसंख्या व आरक्षण | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| **विद्यार्थी कल्याण मंडळ विभागासाठी विद्यापीठ निधीतून १ वर्षे कालावधीसाठी भरावयाची पदे** | | | |
| ६. | प्लेसमेंट ऑफिसर<br>(रु.१००००/- एकत्रित वेतन) | १- खुला | एम.बी.ए (MBA-HR) किंवा एम.पी.एम (MPM-HR)<br>प्लेसमेंटचा कामाचा किमान एक वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ७. | प्लेसमेंट को-ऑर्डीनेटर<br>(रु.८०००/- एकत्रित वेतन) | १- इमाव | बी.एस्सी (संगणकशास्त्र) किंवा कोणत्याही शाखेचा पदवीधर. संगणकाचे उत्तम ज्ञान आवश्यक. तत्सम कामाचा किमान दोन वर्षांचा अनुभव आवश्यक. |
| ८. | हेल्पर<br>(रु.५०००/- एकत्रित वेतन) | १- खुला | एस.एस.सी उत्तीर्ण,<br>अनुभव असल्यास प्राधान्य. |

## सर्वसाधारण सूचना

- **अर्ज व अर्ज शुल्क (फी)**

विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) प्रकाशन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ७ येथे **दि. १५/१२/२००८** पर्यंत रु.१००/- रोखीने भरल्यास उपलब्ध होतील.

**किंवा**

रु.१००/- रकमेचा कोणत्याही राष्ट्रीयकृत/सेड्युल्ड बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) किंवा आय.पी.ओ **मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७** यांच्या नावे व स्वतःचा नाव व पत्ता असलेला लिफाफा रुपये १०/- च्या टपाल खर्चासह **दि. ०८/१२/२००८ पूर्वी** पाठविल्यास अर्ज पाठविले जातील. तथापि, टपाल खात्याकडून टपाल वेळेवर प्राप्त न झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

**किंवा**

विद्यापीठ संकेतस्थळावरून अर्ज डाऊनलोड करून रु.१००/- चा **मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७** यांच्या नावे असलेला कोणत्याही राष्ट्रीयकृत बँके/सेड्युल्ड बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) किंवा आय.पी.ओ अर्जासोबत जोडावी.

- **अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत व पत्ताः**

पात्र उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज संपूर्ण माहिती भरून त्यांच्या नियोक्त्यामार्फत आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह **दि. १५/१२/२००८** रोजी सायं.६.०० वाजेपर्यंत **मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ४११ ००७** यांच्या नावे पाठवावेत. त्यानंतर पोस्टाने किंवा इतर माध्यमातून प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

- **वयोमर्यादाः**

पद क्रमांक १ साठी किमान ३० वर्षे आणि कमाल ४० वर्षे.
पद क्रमांक २ साठी किमान २५ वर्षे आणि कमाल ३५ वर्षे.
पद क्रमांक ३ ते ८ साठी किमान १८ वर्ष पूर्ण व कमाल ३३ वर्षे.

२) अनुसूचित जाती (बौद्ध धर्मांतरितांसह), अनुसूचित जमाती तसेच समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विशेष मागास प्रवर्ग, वि.जा(अ), भ.ज(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) व इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांना विहित कमाल वयोमर्यादा **पाच वर्षांनी** शिथिलक्षम असेल.
३) खेळांडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून वयोमर्यादेत **५ वर्षापर्यंत** वयाची अट शिथिल करण्यात येईल.
४) पात्र अपंग उमेदवार, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, माजी सैनिक यांना वयाच्या **४५ वर्षापर्यंत** शिथिलक्षम राहील.
५) अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादा गणली जाईल.

- **अपंगासाठीचे आरक्षणः**

१) अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा व वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे.
२) फक्त कायम स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या उमेदवारांना अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे व वयोमर्यादेतील सवलतींचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरुपातील अपंगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना अपंग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत.

- **मागासवर्गांचे आरक्षण :**

१) जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियमन - २००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

२) वि.मा.प्र, वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) किंवा इ.मा.व. प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नाहीत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबत दि.३१/०३/२००८ नंतरचे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राच्या प्रती जोडणे आवश्यक आहे अन्यथा अशा उमेदवारांचा इतर मागासवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

३) उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणाऱ्या वि.मा.प्र, वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) किंवा इ.मा.व. प्रवर्गातील उमेदवारांना वयोमर्यादा,आरक्षण या सवलतींसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाहीत.

४) अनुसूचित जाती, विजा(अ), भज(ब), भज(क), भज(ड), इमाव व विमाप्र या प्रवर्गातील उमेदवारांनी नियुक्तीनंतर जातीवैधता प्रमाणपत्र सहा महिन्यात सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती ही आपोआप संपुष्टात येईल. अनुसूचित जमाती या प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही. शक्य असल्यास अर्जासोबतच जातीचे वैधता प्रमाणपत्र जोडावे.

- **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन :**

१) शासनाने शासकीय विभागातील गट - अ,ब,क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित करणारे महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेद्वारे पारित केले आहे. या नियमांतील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे. सदरचे प्रतिज्ञापन अर्जासोबत प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज रद्द ठरविण्यात येईल. अविवाहित उमेदवारांनीसुद्धा प्रतिज्ञापनात अविवाहित असल्याचे नमुद करुन प्रतिज्ञापन सोबत सादर करणे बंधनकारक आहे.

२) प्रतिज्ञापनात अनुक्रमांक - ३ येथे नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.

३) या नियमातील व्याख्येनुसार लहान कुटुंब याचा अर्थ, दोन अपत्ये यांसह पत्नी व पती असा आहे.

- **लेखी परीक्षा :**

१) शासन निर्णयानुसार वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील पदे भरण्यासाठी उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा आयोजित करून गुणानुक्रमे, पदनिहाय, प्रवर्गनिहाय, गुणवत्ता यादी तयार करून त्यामार्फत मुलाखती आयोजित करण्यात येतील.

२) लेखी परीक्षेबाबत उमेदवारास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. परीक्षेकरिता अथवा अभ्यासक्रमाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे संदर्भ पुस्तक विद्यापीठातर्फे पुरविण्यात येत नाही. त्यामुळे अशा स्वरुपाच्या कोणत्याही चौकशीची दखल घेण्यात येणार नाही व अशा चौकशीच्या संदर्भातील पत्रे कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरी दाखल करण्यात येईल.

३) परीक्षेच्यावेळेस परीक्षा-कक्षात किंवा परीक्षा-केंद्राच्या परिसरात, तसेच कौशल्य चाचणी व मुलाखतीच्यावेळी विद्यापीठाच्या कार्यालयात किंवा परिसरात भ्रमण-ध्वनी (मोबाईल फोन), पेजर अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे. सदर सूचनांचे उल्लंघन करणारा उमेदवार अपात्रतेच्या कारवाईस पात्र ठरेल.

४) लेखी परीक्षेकरीता गुणांची पडताळणी अथवा फेरतपासणी करण्याबाबतची निवेदने कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाही.

- **इतर सूचना :**

१) अर्जदाराने अर्ज करतेवेळी शिक्षण, वय, पदासाठी असलेले आरक्षण याबाबी विचारात घेऊनच अर्ज करावेत. विद्यापीठाच्या विहीत नमुन्यातच अर्ज करावा. अन्यथा अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

२) प्रत्येक पदासाठी विहीत नमुन्यातील छापील अर्ज स्वतंत्ररित्या करणे आवश्यक आहे. अर्जावर व पाकिटावर ज्या पदासाठी अर्ज करणार आहात त्या पदाचे नाव लिहिणे तसेच अर्जावर स्वतःचा फोटो लावणे आवश्यक आहे.

३) मागासवर्गीय प्रवर्गातील पद असल्यास ज्या प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे, त्याच प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज करावेत. महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या मागासवर्गीय जाती, जमातीच्या उमेदवारांचाच विचार केला जाईल. महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज केल्यास ते खुल्या प्रवर्गात गणले जातील.

४) जाहिरातीमधील नमूद पदे भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे. प्रत्यक्ष पद भरतेवळी उपलब्ध पदानुसार पदसंख्या बदलू शकेल.

५) महिला अर्जदारांनी नाव बदलाबाबत योग्य ते प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

६) सध्या सेवेत असणाऱ्या उमेदवारांनी नियोक्त्यामार्फत अर्ज पाठविणे आवश्यक आहे.

७) संगणक ज्ञानासंबंधी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

८) चतुर्थ श्रेणीतील पदांव्यतिरिक्त इतर संवर्गातील पदांकरिता उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाची एम.एस.सी.आय.टी अथवा डी.ओ.इ.ए.सी.सी संस्थेचा 'सी.सी.सी.' किंवा 'ओ' स्तर, किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

९) अर्जासोबत सर्व प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत शिफारसपत्रे किंवा रोख रक्कम जोडू नये.

१०) उमेदवाराने भरतीप्रक्रियेत संबंधित अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण आणण्याचा कोणताही प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

११) लेखी परीक्षा, कौशल्य चाचणी अथवा मुलाखतीसाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवासखर्च देय नाही.

१२) मुलाखत/नेमणूक यापैकी कोणत्याही टप्प्यावर टपालखात्याकडून उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३) विहीत मुदतीत न येणाऱ्या, विहीत नमुन्यात नसलेल्या, अपूर्ण अर्ज आणि खाडाखोड केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**जाहिरात क्रमांक** : ४५
**दिनांक** : २१/११/२००८

**डॉ. मा. ल. जाधव**
कुलसचिव